## दिनांक – २४/१२/२०२५

**<u>शपथेवर फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.डी. वसेकर यांचेमार्फत सुरु.</u>**

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, दि.०७.०३.२०१४ रोजीचा करार या प्रकरणात आजतारखेपर्यंत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर करार निश्चित किती रक्कमेकरिता केला होता असे फिर्याद मध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७.३.२०१४ रोजी फिर्यादीने आरोपीला किती रक्कम दिली याचा उल्लेख फिर्याद नि.क्र.१ मध्ये नाही. मी दि.०७.०३.२०१४ रोजीचा करार पाहिलेला आहे. सदरचा करार एकूण किती रक्कमेकरिता केला असा मजकूर मी माझ्या डोळयांनी पाहिलेला नाही. सदर करारासोबत कोणते वाहनाचे कागदपत्र जोडले होते आणि त्या वाहनाचा क्रमांक मला सांगता येईल. त्या वाहनाचा क्र. एम.एच.१०.एस.४६९५, एम.एच.४५.एफ.५८६३, एम.एच.४५.एफ.५८६२ असे आहेत.

**<u>प्रश्नः-</u>** या क्रमांकाची वाहने नक्की कोणाच्या नावावर आहेत याची खातरजमा तुम्ही आजपर्यंत केली आहे का ?
**<u>उत्तरः-</u>** करारामध्ये सदर वाहनाचे क्रमांक नमूद आहेत. त्याप्रमाणे मी सांगितले आहेत.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने फिर्यादी कारखान्याला उत्तरी नोटीस दिलेली आहे. मी साक्ष देण्यापूर्वी उत्तरी नोटीस वाचून पाहिली आहे. नोटीसमध्ये आरोपीने काय मजकूर लिहिला आहे, हे आता मला पाहिल्याशिवाय सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसमध्ये आरोपीने असे कथन केले आहे की, दि.३१.०३.२०१५ रोजी रक्कम रु. ७,११,३९९/- घेतले होते. साक्षीदार सांगतात की, दि ३१.०३.२०१५ पर्यंत रक्कम रु.७,११,३९९/- उचल कारखान्याने दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसमधील मजकूर की, सदर रक्कम उचल घेतली त्यावेळी कारखान्याला आरोपीने दोन कोरे धनादेश तारण म्हणून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने दोन धनादेशापैकी एक धनादेशाचा गैरवापर करुन प्रस्तुतची खोटी केस दाखल केली आहे असा मजकूर लिहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आरोपीची फसवणूक करुन गुन्हा केला आहे व आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करु नये असा मजकूर लिहिला आहे. साक्षीदार सांगतात की, उत्तरी नोटीसीमधील संपूर्ण मजकूर खोटा आहे, तो फिर्यादीला मान्य नाही.

**१२.** दि ०७.०३.२०१४ रोजीचा करार दाखल करायला मी तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७.०३.२०१४ रोजीचा करार आजतारखेपर्यंत दाखल

करण्याची मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, केस लांबविण्याच्या उद्देशाने व आरोपीला त्रास व्हावा म्हणून आजतारखेपर्यंत दि.०७.०३.२०१४ रोजीचा करार या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादीकडे दि ०७.०३.२०१४ करारच नसल्यामुळे तो आजपर्यंत दाखल केलेला नाही.

**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री ए.डी.वसेकर यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकूब करण्यात येतो.**

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.24 15:50:36 +0530

दिनांकः २४/१२/२०२५ (आर. बी. कुलकर्णी)
ठिकाणः आटपाडी. सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
आटपाडी